MHST110000262019

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२०१९**

**नथु उर्फ नाथाजी शेटे वै. : वादी**

**वि.**

**शकुंतला नरहर पडवळ वै. : प्रतिवादी**

## आदेश नि. ७७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०८–महादेव सावळा शेटे याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथन की, प्रतिवादी क्र.०८–महादेव सावळा शेटे हे दि. ११.०१.२०२४ रोजी कण्हेर येथे मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र.०८–महादेव यांना त्यांच्या पश्चात प्रस्तुत अर्जात नमुद व्यक्ती वारस आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र. ०८ चे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब, वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी व तशी दुरूस्ती दाव्याच्या सरनाम्यात दुरुस्ती करणेची विनंती केली.

०३. प्रतिवादी क्र. १, ७,८,९,११ व १२ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देवुन अर्ज मंजुर करणेस तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी ०७ महिने उशीराने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. वादी यांनी उशीराबाबतचे संयुक्तिक कारण अर्जात दिलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात यावा व अर्ज मंजुर केल्यास वादी यांच्यावर जास्तीत जास्त वादखर्च (cost) लादणेत यावा.

०४. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. वास्तविक पाहता प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.०८– महादेव यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. सदरची दुरुस्ती ही दाव्याच्या मथळयातील दुरुस्ती आहे. तसेच वादी यांचा प्रतिवादी क्र.०८–महादेव याचे वारस अभिलेखावर घेणेस जो विलंब झाला आहे, तो विंलब माफीचा अर्ज (नि.क्र.७३) व

प्रतिवादी क्र.०८– महादेव याचेविरुध्द दावा उपशमन (abatement) रद्दचा अर्ज (नि.क्र.७५) मंजुर करणेत आलेले आहेत. वादी यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्ठयर्थ निशाणी क्र. ७८ कडे प्रतिज्ञा दाखल केले आहे. त्यामुळे, दाव्यातील गुंतागुंत टाळणेसाठी तसेच प्रस्तुत दावा निकाली करण्यासाठी मयत प्रतिवादी क्र.०८– महादेव याचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब, वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादी यांचा नि.क्र. ७७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०८–महादेव सावळा शेटे याचे वारस अभिलेखावर घेवुन तशी दुरुस्ती दाव्यामध्ये या आदेशापासुन १४ दिवसाचे आत विनाकसुर करावी.

३. प्रस्तुत दाव्यामध्ये उपरोक्त कालावधीत दुरुस्त करणेत येवुन दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल केली नाही तर प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात आलेचे समजावे.

VIKRAM AMBADAS AVHAD

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2026.07.07 17:43:18 +0530

**दिनांक** – ०७.०७.२०२६ (डॉ. विक्रम अं. आव्हाड)

**ठिकाण** – मेढा **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**